# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/12/2022 (मंगळवार) दुपार

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. नरखेड–** दिनांक १९/१२/२०२२ चे १०.३० वा. ते १७.३० वा. चे सुमारास पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्षे ११ महीने ही नेहमी प्रमाणे शाळेत जाते असे सांगुन घरुन निघुन गेली. सायंकाळी ०५.३० वाजता पर्यत घरी परत न आल्याने तिच्या आजुबाजुला नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले पो. स्टे. नरखेड मो. नं. ९८९०३७५३९६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा–** दिनांक १८/१२/२०२२ चे ०८.३० वा. ते ०९.०० वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्दीत फिर्यादी हिचा अल्पवयीन मुलगा वय १२ वर्षे हा दिनांक १७/१२/२०२२ रोजी शनिवारला तु शाळेत गेला नाही व तु पतंग उडवित राहतो व अभ्यास बरोबर करत नाही असे रागातुन बोलले असता तो रागाच्या भरात घराचे स्लॅब वरून खाली उतरला व शाळेचे दफ्तर घेवुन निघुन गेला त्याचा नातेवाईक मित्र मंडळी व इतर ठिकाणी शोध घेतला परंतु मिळुन आला नाही फिर्यादीच्या अल्पवयीन मुलास कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मिश्रा पोस्टे खापरखेडा मो. नं. ९५११२९०८४८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. अरोली–** दिनांक १८/१२/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक १९/१२/२०२२ चे रात्री ०२.०० वा. चे दरम्यान पो.स्टे. अरोली हद्दीत फिर्यादी हिची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षे हिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय जाधव मो. क्र. ९८७०३२८९०४ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. भिवापूर–** दिनांक १८/१२/२०२२ चे १०.०० वा. चे दरम्यान पो.स्टे. भिवापूर हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष व ७ महीने वर्षे हिला यातील फिर्यादी हा आपले घरचे शेतात पत्नी व मुलगा यांचे सोबत चन्याला पाणी देण्याकरीता गेले असता यातील आरोपी नामे– विवेक मोहीनकर, रा. उमरेड जि. नागपुर याने फिर्यादी याची अल्पवयीन मुलगी हीला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश चंगोले मो. नं. ९८२३३८०८१५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**